मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
पैठण येथे आपल्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना
प्रशिक्षणासाठी पाठविणे बाबत.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक 9828
दिनांक 29 NOV 2019

# मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, जि.औरंगाबाद

(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था)

परिपत्रक क्रमांक - मप्रविप्रप्र/प्रशिक्षण/नानि/2019-20/448
दि. 22 /11/2019

वाचा -
1) सा.प्र.वि.शा.नि.क्र.टि.आर.एन-2009/प्र.क्र/9/09/12-अ दि23/09/2011
2) सा.प्र.वि.शा.नि.क्र.टिआरएन-2011/प्र.क्र./287/11/12-अ दि.14/10/2013
3) सा.प्र.वि.शा.परि.क्रं.टीआरएन-2014/342/प्र/30/14/12अ दि 27/05/2014
4) सा.प्र.वि.शा.नि.क्रं.टिआरएन-11/प्रक्र283/11/12-अ दि.30/01/2012

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमत्ता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व अधिकारी/कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची निकड लक्षात घेवून संदर्भ क्रं. 1 च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्रं. 2 नुसार राज्य स्तरावर यशदा, पुणे तर मराठवाडा विभागासाठी विभागीय स्तरावर मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उ), पैठण, जि. औरंगाबाद यांना शिखर संस्था म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर संस्थेव्दारे सातत्याने वर्ग-ब व क च्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी विविध टप्प्यांवरील प्रशिक्षण सत्र कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येवून त्याबाबत मराठवाडयातील सर्व विभागीय/जिल्हास्तरीय कार्यालयांना मेल व्दारे तसेच दुरध्वनीव्दारे वेळोवेळी कळविण्यात येते.

संस्थेतील प्रशिक्षण संबंधित मागील सहा महिन्याचा आढावा बघता माझ्या असे निदर्शनास आले आहे की, या संस्थेव्दारे प्रशिक्षणासाठी केलेल्या पत्रव्यवहाराला गांभीर्याने घेतले जात नाही. प्रशिक्षणासाठी पात्र अधिकारी/ कर्मचारी (तांत्रिक/अतांत्रिक/वैद्यकीय/प्रशासकीय) यांचे नामनिर्देशन करण्यात येत नाही. नामनिर्देशित केलेले अधिकारी/ कर्मचारी अशा प्रशिक्षणास जात नाहीत अथवा संबंधित विभागाकडून अशा अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात येत नाही. संबंधित प्रशिक्षणासाठी कमी प्रमाणात अधिकारी/ कर्मचारी उपस्थित राहील्याने अनेकवेळा प्रशिक्षण सत्र रद्द करावे लागत आहे. त्यामुळे संस्थेतील उपलब्ध मनुष्यबळ व साधन सामुग्री यांचा अपव्यय होत असुन शासनाचा प्रशिक्षण धोरणाचा हेतु साध्य होत नाही, याची गांभीर्याने दखल घेण्यात येत आहे.

करीता, प्रशिक्षण संस्थाने नामनिर्देशन मागविलेली असताना आपत्ती, निवडणूक, जनगणना, कायदा व सुवस्था, या परिस्थिती व्यतिरिक्त विभागाने नामनिर्देशन न केल्यास तसेच सुट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता न घेतल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर म.ना.से (शिस्त व अपील) नियम 1979 च्या तरतुदी नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व पर्यायी अधिकाऱ्यांची नावे कळवावी, नामनिर्देशित अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्यास संबधितांकडून प्रशिक्षणासाठी येणारा खर्च त्या व्यक्तीच्या पगारातून कपात करुन प्रशिक्षण संस्थेच्या खातेवर जमा करावे व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी.

आस्था-2

29/11



Scanned by CamScanner

तसेच प्रशिक्षणासाठी कार्यालय/विभागप्रमुख हे पात्र अधिकारी/कर्मचारी यांना कार्यमुक्त करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास संदर्भ क्रं 4) अन्वये संबंधित विभागप्रमुख/अधिकाऱ्याविरुध्द कारवाईसाठीचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांचेकडे पाठविण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(सुनिल केंद्रेकर) 25/11/19
विभागीय आयुक्त
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती,
म.प्र.वि.प्र.प्र पैठण

प्रत,

1. जिल्हाधिकारी सर्व, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद विभाग
2. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व, जिल्हा परिषद, औरंगाबाद विभाग
3. आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद/ परभणी/ नांदेड/ लातूर
4. विक्रिकर आयुक्त, वस्तु व सेवा कर भवन, औरंगाबाद/ लातूर
5. मुख्य प्रशासक, सिडको, औरंगाबाद
6. पोलिस आयुक्त, आयुक्तालय, औरंगाबाद
7. तुरुंग अधिक्षक, औरंगाबाद
8. जिल्हा पोलिस अधिक्षक सर्व, औरंगाबाद विभाग
9. उपायुक्त, महसुल शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
10. उपायुक्त, विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
11. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, औरंगाबाद विभाग
12. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद विभाग
13. मुख्य प्रशासक, म्हाडा, औरंगाबाद
14. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद/ लातुर
15. उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग
16. उपायुक्त, दुग्धविकास, औरंगाबाद विभाग
17. प्रादेशिक परिवहन अधिकारी, परिवहन कार्यालय, औरंगाबाद विभाग
18. विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद/ लातूर
19. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था(लेखापरिक्षण), औरंगाबाद/ लातूर
20. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद/ लातूर
21. सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद विभाग
22. सहसंचालक, स्थानिक निधी व लेखा परिक्षण, औरंगाबाद विभाग
23. सहसंचालक, समाजकल्याण, औरंगाबाद विभाग
24. सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण, औरंगाबाद विभाग
25. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण, औरंगाबाद
26. उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद/ लातूर
27. उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद/ लातूर
28. उपसंचालक, शिक्षण विभाग, औरंगाबाद
29. उपसंचालक,कला संचालनालय, औरंगाबाद विभाग
30. जिल्हा क्रिडा अधिकारी सर्व, औरंगाबाद विभाग
31. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सर्व, औरंगाबाद विभाग
    व अधिनस्त सर्व कार्यालय

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९ 3436
दिनांक:- 02 DEC 2019

**महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी, पैठण जि.औरंगाबाद (विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था) यांच्या दिनांक २२.११.२०१९ च्या परिपत्रकातील सुचना आपल्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच ज्या कर्मचा-यांचे अद्याप पर्यंत उजळणी/पायाभूत प्रशिक्षण पुर्ण केले नाही अशा कर्मचा-यांची तात्काळ नावे या कार्यालयास कळविण्यात यावीत, जेणे करुन सदर कर्मचा-यांना उजळणी /पायाभूत प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करणे सुलभ होईल.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:- प्रोग्रामर यांना माहिती व या कार्यालयाच्या ई-मेलद्वारे सर्व शासकीय संस्थांना मेल करण्यासाठी